FORM-I A

N.C.R.B.
I.I.F.

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State: महाराष्ट्र  जिल्हा District: मुंबई  पोलिस ठाणे Police Station: ला.प्र.वि.  पहिली खबर क्र. FIR No.: ०८  Year: २०१९  दिनांक Date: ०१/०२/१९

2. (i) अधिनियम Act: भ्र. प्र. अधिनियम  कलमे Sections: ७
   (ii) अधिनियम Act: १९८८ (सुधारित)  कलमे Sections:
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections:

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day —  तारीख पासून Date from: १८/१२/१९  वेळ Time —  तारीख पर्यंत Date to: ०१/०२/१९  Time
   कृपया लागू भाग (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00  (2) 03.00 ते 06.00  (3) 06.00 ते 09.00  (4) 09.00 ते 12.00  (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00  (7) 18.00 ते 21.00  (8) 21.00 ते 24.00  (9) 06.00 ते 18.00  (10) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P.S.  तारीख Date: १८/१२/२०१९  वेळ Time
   (c) गुन्हा दाखल झालेल्या स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: २१/२०१९  तारीख Date: ०१/०२/१९  वेळ Time: १३.४० वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information: लेखी  लेखी / तोंडी Written / Oral —

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S.: ०६ कि.मी.  चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. —
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: जे. जे. [illegible] कंम्पाऊंड  ठिकाणाचे नंबर No. if any: सेन्ट्रल कन्युग महेबे  गल्ली Ward —  रस्त्याचे नाव Name of road —
   जवळचे ओळखीचे चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place: जे. जे. मार्ग  गाव Village: पो. ठाणे  पोस्ट Post: ४००००८  तालुका Taluka: मुंबई  जिल्हा Distt: मुंबई  राज्य State: महाराष्ट्र
   (c) पोलीस ठाण्याचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station —  तालुका Taluka —  जिल्हा Distt. —  राज्य State —

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address
   (a) नाव Name: पंकज राजा  (b) वडीलांचे / पतीचे नाव Father's /Husband's Name: नटवरलाल राजा
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age: १३/०२/१९६९ ५० वर्षे,  (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय  फोन नं. Phone No.: ९९२०१९९९८६३
   (e) पारपत्र क्रमांक Passport No.  दिल्याचा दिनांक Date of Issue  दिल्याचे ठिकाण Place of Issue  (f) व्यवसाय Occupation
   (g) धर्म Religion: हिंदू  जात Caste: गुजराती वैष्णव  जनजाती Sub-Caste
   (h) पत्ता Address: रुम क्र. ४, एम. एन. चाळ, मुकुंद सोसायटी, एम. जी. रोड, असल्फा विलेज, [illegible] नगर, घाटकोपर (प.) मुंबई ४०००८४.
   Ward  House Name No.  Phone/M. No.  Par No.  Card No.
   रस्त्याचे नाव Road  जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place  गाव Village  पोस्ट Post  पो. स्टे. P. Stn.
   तालुका Taluka: घाटकोपर  जिल्हा Distt: मुंबई  राज्य State: महाराष्ट्र  सध्याचा पत्ता Present Address

7. Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

• महेंद्र अशोक रावत वय ३३ वर्षे, धंदा - नोकरी, हुद्दा - कक्ष सेवक, रा. - जे. जे. रुग्णालय कर्मचारी वसाहत [illegible] इमारत, रुम क्र. १४, [illegible] मजला, नागपाडा, मुंबई ४००००८, गावचा पत्ता - मु. पो. मोठी [illegible], तालुका - बोरसद, जिल्हा - आणंद, गुजरात राज्य,

फिर्यादी श्री पंकज जटवरलाल राजा वय ५० वर्षे, रा.ठी. रूम क्र. ४, एस एम चाळ, मुकुंद सोसायटी, एन एस एस रोड, असल्फा व्हिलेज, मिलिंद नगर, घाटकोपर (प.) मुंबई ४०००८४ यांच्या सोबत जोडलेल्या स्वतंत्र पानांवर संगणकावर टंकलिखित केलेला फिर्यादी माझ्या जवळ प्रथम खबरी अहवाल समजण्यात आला.

समक्ष

(मनोज गुजर)
पोलिस निरीक्षक,
ला०प्र० विभाग, मुंबई.

फिर्याद                                        दिनांक ०१/०२/२०१९.

श्री.पंकज नटवरलाल राजा, वय ५० वर्षे, व्यवसाय-नोकरी, रा.ठी. रुम नं. ४, एम.एम.चाळ, मुकुंद सोसायटी, एल.एम.एस. रोड, असल्फा व्हिलेज, मिलींद नगर, घाटकोपर (प), मुंबई ४०० ०८४ मो.क्र. ९९२०७९९९८६, आधारकार्ड क्र. ५१२७ २०३० ४१५० पॅन कार्ड क्र. AACPR0501P

०००

मी वरील प्रमाणे असून वर नमूद पत्त्यावर जन्मापासुन राहण्यास आहे. माझ्या सोबत माझी वयोवृध्द आई नामे निर्मला नटवरलाल राजा वय ७९ वर्षे राहते. मी सी.ए.फर्म मध्ये नोकरीस आहे. माझे लग्न सन १९९९ मध्ये ज्योती पंकज राजा हिच्याबरोबर झाले.

दिनांक १४.१२.२०१८ रोजी मी काम करीत असलेल्या सी.ए. फर्मचे मालक श्री.जयेश मिस्त्री यांनी त्यांच्या ईमेल आयडीवरुन माझ्यावतीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या ईमेल आयडीवर तक्रार दिलेली होती.त्याचदिवशी म्हणजे दिनांक १४.१२.२०१८ रोजी मला पोलीस निरीक्षक गुजर, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचा माझ्या मोबाईलवर फोन आला व त्यांनी मी ईमेलवर दिलेल्या तक्रारीबद्दल विचारले व मला आयकर भवन, बी.के.सी. येथे भेटण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी बी.के.सी. येथे पोहचलो. त्याठिकाणी मला पो.नि.गुजर भेटले. त्यांनी स्वतःची ओळख करुन देवुन त्यांचेसोबत आलेले दोन शासकिय पंच व पो.नि. घाडीगांवकर यांची ओळख करुन दिली. त्यानंतर पो.नि.गुजर यांनी मी दिलेली तक्रार ही कोणत्या स्वरुपाची आहे व माझे काय म्हणणे हे समजुन घेण्याकरीता मला ब्युरो कार्यालयात येवुन रितसर तक्रार देणे आवश्यक असल्याचे सांगितले. मला त्यांचे म्हणणे पटल्याने मी पो.नि. गुजर यांचेसोबत त्यांच्या शासकिय वाहनात बसुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वरळी, मुंबई येथे आलो. त्याठिकाणी मी माझ्या स्वहस्ताक्षरात इंग्रजी भाषेत तक्रार अर्ज लिहुन दिला.

माझ्या तक्रार अर्जाप्रमाणे, दिनांक २८.१२.२०१७ रोजी माझ्या पत्नीचे अचानकपणे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्याबाबत मी घाटकोपर पोलीस ठाणे येथे कळविल्याने घाटकोपर पोलीस ठाणे येथे अपमृत्यु क्र. २६४/२०१७ प्रमाणे नोंद करुन पुढील कार्यवाही करण्यात आली. तसेच माझ्या मृत पत्नीवर राजावाडी रुग्णालयात शवविच्छेदन करुन त्याबाबत व्हिसेरा राखुन ठेवण्यात आला होता. त्यावेळेस माझ्या पत्नीच्या मृत्युचे नक्की कारण समजले नव्हते. ते कारण समजण्याकरीता पत्नीचा व्हिसेरा जे.जे. रुग्णालय, मुंबई येथे पाठविण्यात आल्याचे मला घाटकोपर पोलीस ठाणे येथुन सांगण्यात आले होते.

समक्ष

( मनोज गुजर )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

माझी पत्नी श्रीमती ज्योती पंकज राजा हिच्या नावे एल.आय.सी.च्या काही पॉलीसी असल्याने सदर पॉलीसीमध्ये मला तिने वारस लावले होते. माझ्या पत्नीच्या मृत्यु पश्चात तिचा वारस म्हणुन मला एल. आय.सी.चे पैसे मिळणार आहेत. त्याबाबत मी एल.आय.सी.च्या कार्यालयामध्ये जावुन विचारणा केली असता तेथील अधिकाऱ्यांनी एल.आय.सी.पॉलीसीच्या कागदपत्रांची माहिती देवुन मयत पत्नी ज्योती राजा यांचा मृत्यु नक्की कोणत्या कारणाने झाला याच्या अंतिम अहवालाची छायांकित प्रत आवश्यक असल्याचे सांगितले. मी घाटकोपर पोलीस ठाणे येथे जावुन महिला अधिकारी श्रीमती कानडखेडकर यांची भेट घेतली असता, त्यांनी सांगितले की, मयत पत्नी यांच्या मृत्यु संबंधी नक्की कारण स्पष्ट होण्यासाठी त्यांचा व्हिसेरा जे.जे.हॉस्पिटल मुंबई येथे पाठविण्यात आला असल्याने पोस्टमार्टेमचा अहवाल प्राप्त होताच आपणांस कळविण्यात येईल असे सांगितले.

त्यानंतर पोस्ट मार्टेम अहवाल प्राप्त करण्यासाठी मी वेळोवेळी घाटकोपर पोलीस ठाणे, राजावाडी हॉस्पिटल आणि जे.जे. हॉस्पिटल मुंबई येथे चकरा मारु लागलो. परंतु मला पोस्टमार्टेमचा अंतिम अहवाल प्राप्त झाला नाही. त्यानंतर साधारण सप्टेंबर २०१८ मध्ये मी जे.जे. हॉस्पिटल येथे गेलो. तेथे माझी एका व्यक्तीशी भेट झाली. त्यावेळी त्या व्यक्तीने आपले नांव निलेश सुपत असे असल्याचे सांगितले. त्यावेळी मी त्यांना माझी पत्नी ज्योती राजा यांचा मृत्यु नक्की कशाने झाला याबाबत पोस्टमार्टेमच्या अंतिम अहवालाची छायांकित प्रत आवश्यक असल्याचे सांगुन त्याबाबतचा व्हिसेरा हा विश्लेषणासाठी जे.जे. रुग्णालय येथे आले असल्याचे सांगितले व त्यांना त्या संबंधित आवश्यक ते कागदपत्रे दाखविले. त्यावर त्यांनी त्यांच्याकडे असलेले मोबाईल क्र. ८४२४०४५८५५ व ८१६९६२९८८९ देवुन ते मला आवश्यक ती मदत करतील व पोस्ट मार्टेमच्या अंतिम अहवालाची प्रत प्राप्त करुन देण्याकरीता रु. १०,०००/- द्यावे लागतील असे सांगितले.

मी खाजगी नोकरी करीत असल्याने व मला खुप कमी पगार असल्याने मला एवढी मोठी रक्कम देणे शक्य होणार नाही असे सांगितले नमुद व्यक्ती नामे सुपत यांना सांगितले. त्यानंतर मी वेळोवेळी नमुद व्यक्ति नामे सुपत यांना भेटून मला पोस्ट मार्टेमचा अंतिम अहवाल कसा मिळेल याबाबत विचारणा केली असता त्यांनी नमुद अहवाल ज्या विभागातून दिला जातो त्याच विभागात ते काम करीत असून त्यांची नमुद विभागात ओळख असून ते माझे काम जलद गतीने करुन देतील असे सांगितले. त्यानंतर मी नमुद विभागात काम करणारे अधिकारी/कर्मचारी यांना भेटुन माझी मयत पत्नी ज्योती राजा हिच्या मृत्युचे कारण

समक्ष

( मनोज गुजर )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

विश्लेषण करणारा अंतिम अहवाल केव्हा व कसा मिळेल याबाबत विचारणा करता मला त्याठिकाणी कोणीही सहकार्य केले नाही.

त्यानंतर वरील व्यक्ती नामे सुपत यांनी मला वेळोवेळी माझ्या मोबाईल फोनवर फोन करुन मला जे.जे.रुग्णालय येथे बोलावुन माझी मयत पत्नी ज्योती राजा हिच्या मृत्युचे कारण विश्लेषण करणारा पोस्ट मार्टेमचा अंतिम अहवाल प्राप्त करुन देण्याकरीता माझ्याकडे रु. ४,०००/- लाचेची मागणी केली. मला नमुद व्यक्तीस लाच देण्याची इच्छा नसल्याने मी वरीलप्रमाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे तक्रार दिली.

दिनांक १४.१२.२०१८ रोजी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जे.जे. रुग्णालय येथे माझे नक्की कोणत्या विभागात आहे? कोणाकडे आहे? ज्याच्याकडे माझे काम आहे ती व्यक्ती कोणत्या खात्याशी संबंधित आहे. त्याबाबत काही कल्पना नसल्याने माझे काम नक्की पोलीस ठाणे स्तरावर प्रलंबित आहे? राजावाडी रुग्णालय येथे प्रलंबित आहे? किंवा जे.जे. रुग्णालय येथे प्रलंबित आहे याबाबत खात्री करणे आवश्यक होते. नमुद माहिती मलाच घेणे शक्य असल्याने पो.नि. गुजर यांनी माझे काम नक्की कोठे अडलेले आहे व कोणाकडे अडलेले आहे याबाबत खात्रीलायक माहिती घेण्यास सांगितले. त्याकरीता त्यांनी मला घाटकोपर पोलीस ठाणे येथे जाण्याचा सल्ला देवुन सविस्तर माहिती घेवुन दिनांक १५.१२.२०१८ रोजी ब्युरो कार्यालयास परत येण्याचे सांगितले.

त्यानंतर पो.नि. गुजर यांनी माझ्या मोबाईल वर फोन करुन मला दिलेल्या सुचनांबाबत विचारणा करुन मला व्यक्ती श्री. सुपत यांचा फोन आला होता का? याबाबत विचारणा करुन त्यांच्याशी काय बोलणे झाले असे विचारले असता माझे व्यक्ती श्री. सुपत यांचेयशी बोलणे झाले असुन ते दिनांक १७.१२.२०१८ रोजी पर्यंत मुंबई बाहेर असल्याचे सांगितले व ते मला भेटणार नसल्याची माहिती दिली. त्यामुळे मी दिनांक १५.१२.२०१८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे येवुन पो.नि.गुजर यांची भेट घेतली नाही.

त्यानंतर दिनांक १८.१२.२०१८ रोजी मला पो.नि.गुजर यांनी माझ्या मोबाईल फोन करुन मी कोठे याबाबत विचारणा करीता मी आयकर विभाग कार्यालय लोअर परेल येथे येत असल्याचे सांगुन त्यांना नमुद कार्यालयाजवळ भेटतो असे सांगितले. त्यादिवशी दुपारी माझा मोबाईल फोन कोठे तरी विसरल्याने मला तो मिळाला नाही व त्यामुळे मला उशीरा पर्यंत पो.नि. गुजर यांच्याशी संपर्क करता आला नाही. मला ज्यावेळेस माझा फोन मिळाला त्यावेळेस मला पो.नि. गुजर यांचा फोन आला व त्यांनी मला लोअर परेल

समक्ष

( मनोज गुजर )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

येथे न येता दादर पुर्व रेल्वे स्थानकाच्या बाहेर स्वामी नारायण मंदिर येथे येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी दादर पुर्व रेल्वे स्थानकाच्या बाहेर स्वामी नारायण मंदिर येथे येवुन पो.नि. गुजर यांची भेट घेतली. दिनांक १४.१२.२०१८ रोजी पो.नि. गुजर यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे माझ्या पत्नीच्या मृत्यू संदर्भात कागदपत्र कोठे व कोणाकडे आहेत. याबाबत संबंधित पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्याकडुन मी माहिती घेतली का? याबाबत विचारणा केली. त्यावर मी सहाय्यक पोलीस आयुक्त व पोलीस उपायुक्त परीमंडळ ७ यांना पत्र दिले असल्याचे सांगितले व त्याची एक प्रत पो.नि.गुजर यांना दाखवली. ते पत्र पाहुन माझ्या पत्नीच्या मृत्यु संदर्भातील कागदपत्र व तिच्या पोस्टमार्टेम संदर्भात विश्लेषणाकरीता कागदपत्र कोठे आहेत. याबाबत खात्री झाली नसल्याने पडताळणीची प्रक्रिया सुरु करता येणार नसल्याचे सांगितले. त्यामुळे पो.नि.गुजर यांनी मला सोबत घेवुन अधिक मार्गदर्शन करण्याकरीता ब्युरो कार्यालयात घेवुन आले त्यांनी मला आवश्यक ते मार्गदर्शन केले व दिनांक १९.१२.२०१८ रोजी घाटकोपर पोलीस ठाणे येथे जावुन आवश्यक ती माहिती घेवुन दिनांक १९.१२.२०१८ रोजी ब्युरो कार्यालयात हजर राहण्यास सांगितले.

पो.नि.गुजर यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी घाटकोपर पोलीस ठाणे येथे जावुन वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची भेट घेतली. त्याठिकाणी मला माझ्या पत्नीच्या मृत्यु बाबत घाटकोपर पोलीस ठाणे अपमृत्यु क्र. २६४/२०१७ असा दाखल असल्याचा सांगुन त्याचा तपास महिला पोलीस अधिकारी करत असल्याची माहिती मिळाली. मी नमुद महिला पोलीस अधिकारी यांची भेट घेतली. त्यांनी मला माझ्या पत्नीच्या मृत्युचे खरे कारण समजण्याकरीता आवश्यक अंतिम अहवाल मिळण्याकरीता जे.जे.रुग्णालय येथे पत्रव्यवहार केला असल्याचे सांगितले व त्याचा पाठपुरावा करण्याकरीता घाटकोपर पोलीस ठाणे अंतर्गत एक महिला पोलीस अंमलदाराची नेमणुक करण्यात आली असुन तिच्या मार्फत पाठपुरावा करुन घेण्यात येत असल्याचे सांगितले. नमुद महिला पोलीस अधिकारी यांनी मला त्या महिला पोलीस अंमलदार यांची ओळख करुन दिली व त्यांचे सोबत जे.जे.रुग्णालय येथे जावुन पुढील आवश्यक तो पाठपुरावा करण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे मी महिला पोलीस अंमलदार यांच्यासोबत जे.जे.रुग्णालय येथे येवुन पाठपुरावा केला. पाठपुरावा करीत असताना घाटकोपर पोलीस ठाणे येथील महिला पोलीस अधिकारी यांनी सर जे.जे. रुग्णालय यांचे नावे घाटकोपर पोलीस ठाणे जा.क्र. २०२२०/१८ दिनांक १८.१२.२०१८ प्रमाणे स्मरणपत्र दिले असल्याचे समजले. त्या पत्राचा मी माझ्या मोबाईल फोटो काढुन घेतला व त्याची प्रिंट घेवुन त्याची एक प्रत पो.नि.गुजर यांचे अवलोकनार्थ सादर केली.

समक्ष

(मनोज गुजर)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

पो.नि.गुजर यांनी नमुद पत्राचे अवलोकन केल्यानंतर माझी पत्नी ज्योती पंकज राजा यांच्या मृत्युपश्चात त्यांच्या देहावर राजावाडी हॉस्पिटल येथे पोस्टमार्टेम होवुन तेथील वैद्यकिय अधिकारी यांनी तिचे H.P.T. टिश्यु सॅम्पल परिक्षणाकरीता घाटकोपर पोलीस ठाणे येथे पाठवुन दिले व तेथील महिला तपासी अधिकारी यांनी दिनांक २८.१२.२०१८ रोजी नमुद टिश्यु सॅम्पल परिक्षणाकरीता जे.जे.रुग्णालय येथे पाठविलेले असुन त्याबाबतचा परिक्षण अहवाल अदयापपावेतो प्राप्त नसल्याचे नमुद करुन तो लवकरात लवकर मिळण्याची विनंती केली.

मी सादर केलेल्या पत्राचे अवलोकन केल्यानंतर पो.नि. गुजर यांना माझे काम जे.जे.रुग्णालय येथे असल्याचे खात्री झाली त्यामुळे मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने माझ्याकडे लाच मागत असलेली व्यक्ती ही जे.जे.रुग्णालयातच काम करीत आहे अगर कसे? याबाबत पडताळणी करणे आवश्यक असल्याची सुचना दिली. त्याप्रमाणे पो.नि. गुजर, पो.नि.घाडीगांवकर, दोन शासकिय पंच व पोलीस पथक असे आम्ही दिनांक १९.१२.२०१८ रोजी जे.जे.रुग्णालय येथे पडताळणी करीता गेलो.

जे.जे.रुग्णालय येथे जावुन व्यक्ती श्री. सुपत यांना त्यांच्या मोबाईलवर फोन करुन ते कोठे भेटतील याबाबत विचारणा केली असता ते त्यादिवशी भेटणार नसल्याचे सांगुन दिनांक २०.१२.२०१८ रोजी १६.०० वा. भेटावयास सांगितले व माझ्या कामासंदर्भात कोठेही चौकशी न करण्याचा सल्ला दिला. त्यावर ज्या विभागात घाटकोपर पोलीस ठाणेस नेमणुकीस असलेली महिला पोलीस अंमलदार यांनी स्मरणपत्र सादर केले होते. त्याठिकाणी जावुन व्यक्ती नामक सुपत यांचा माझ्या मोबाईलमधील फोटो दाखवुन त्याठिकाणी कार्यरत असलेल्या एका कर्मचाऱ्यास विचारणा केली असता त्यांनी नमुद व्यक्ती ही जे.जे.रुग्णालयात कोठेही फिरत असते ती कोणत्या विभागात, कोणत्या पदावर कार्यरत आहे याबाबत त्यांना काही माहिती नाही. परंतु नमुद व्यक्ती ही जे.जे.रुग्णालयाच्या आस्थापनावर नसावी, असे मत प्रदर्शित केले.

त्यानंतर पो.नि.गुजर यांच्याशी समन्वय साधुन दिनांक २०.१२.२०१८ रोजी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणीचे आयोजन करण्यात आले. नमुद दिवशी माझे व्यक्ती नामे सुपत यांच्याशी भेट झाली. त्यांनी माझे काम जवळ जवळ झाले आहे असल्याचे सांगुन माझेकडे रु.४,०००/- लाचेची मागणी केली. तसेच माझ्या कामाचे रिपोर्टस् वर संबंधित डॉक्टरांच्या स्वाक्षरी झाल्यानंतरच नमुद रिपोर्ट हा माझ्या ताब्यात न मिळता तो परस्पर पोलीस ठाण्यात पाठविण्यात येईल असे सांगितले व या कामासाठी पंधरा ते वीस जातील असे देखील सांगितले. त्यादिवशी देखील नमुद व्यक्ती ही कोण आहे तो

समक्ष

( मनोज गुजर )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

लोकसेवक आहे का? हे खात्री होत नसल्याने पडताळणीची पुढील कारवाई दिनांक २१.१२.२०१८ रोजी करण्यात येणार असल्याचे ठरले. त्यानंतर मी व पो.नि.गुजर हे एकमेकांच्या संपर्कात होतो. व्यक्ती नामे सुपत यांना मी संपर्क साधुन माझ्या कामाबाबत विचारणा करता त्यांनी माझ्या कामाकरीता पंधरा ते वीस दिवस लागतील असे सांगितले होते. त्यामुळे मी ब्युरो कार्यालयात आलो नाही. मी व्यक्ती सुपत यांच्याशी वेळोवेळी संपर्कात होतो.

त्यानंतर काल दिनांक ३१.०१.२०१९ रोजी व्यक्ती नामे सुपत यांनी माझ्या मोबाईलवर फोन करुन माझे काम अंतिम टप्यात आले असुन त्यांना भेटण्याकरीता बोलाविले. नमुद बाब मी पो.नि. गुजर यांना सांगुन मी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी कारवाई करणे आवश्यक असल्याचे सांगुन त्याप्रमाणे पडताळणी कारवाईचे आयोजन केले. पडताळणी कारवाईमध्ये माझ्या सोबत शासकिय पंच श्री. नचिकेत संजीव आमटे यांना सोबत देवुन नमुद पंच हे मी ज्यांच्याकडे काम करतो त्यांचा मुलगा असल्याचे भुमिका करणार असल्याचे ठरले. त्याप्रमाणे मी पंच श्री.नचिकेत आमटे यांचेसोबत काल दिनांक ३१.०१.२०१९ रोजी व्यक्ती नामे सुपत यांची जे.जे.रुग्णालय येथे जावुन भेट घेतली असता, नमुद व्यक्ती नामे सुपत हे जे.जे.रुग्णालय येथे टेक्नीकल असिस्टंट या पदावर मागील २० वर्षापासुन काम करीत असल्याचे सांगितले. तसेच नमुद व्यक्ती सुपत यांनी पंच श्री.नचिकेत आमटे यांच्या समक्ष माझ्या पत्नीच्या पोस्टमार्टेम रिपोर्टचे अंतिम अहवाल मिळवुन देण्याकरीता रु.५०००/- लाचेची मागणी केली. व्यक्ती नामे सुपत यांनी मागणी केलेली रक्कम मोठी असल्याने व ती त्यावेळेस माझ्याकडे नसल्याने मी त्यांना नमुद रक्कम रु. ५,०००/- आज दिनांक ०१.०२.२०१९ रोजी देतो असे सांगितले असता, त्यांनी ती पुन्हा पंच श्री. नचिकेत आमटे यांचेसमक्ष स्विकारण्याचे मान्य केले. दिनांक ३१.०१.२०१९ रोजी व्यक्ती नामे सुपत यांनी माझ्याकडे रु.५,०००/- लाचेची मागणी केल्याचे पडताळणीमध्ये स्पष्ट झाल्याने दिनांक ०१.०२.२०१९ रोजी सापळापुर्व/सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येणार असल्याचे पो.नि.गुजर यांनी मला तसेच पंच साक्षीदार व पोलीस पथक यांना सुचना देवुन दिनांक ०१.०२.२०१९ रोजी ब्युरो कार्यालयात हजर रहाण्याचे सुचना दिल्या.

दिनांक ३१.०१.२०१९ रोजी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी दिनांक ०१.०२.२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे पो.नि.गुजर यांच्या समक्ष हजर झालो. पो.नि.गुजर यांच्या सुचनेप्रमाणे सापळापुर्व/सापळा कारवाईचे तयारी केल्यानंतर पो.नि.गुजर, पो.नि.धाडीगांवकर, पो.शि मठपती, पो.शि.मिरगणे, पो.ना.सुदेश कदम, दोन शासकिय पंच व पोलीस पथक असे दोन शासकिय

समक्ष

( मनोज गुजर )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

वाहनाने निघुन जे.जे.रुग्णालय, मुंबई च्या बाजुस असलेल्या नागपाडा पोलीस रुग्णालय येथे येवुन थांबलो. तेथे पो.नि.गुजर यांनी सापळापुर्व/सापळा कारवाईचे आयोजन करुन मला सापळा पथक व पंचास कारवाईच्या दरम्यान घ्यावयाच्या दक्षेत बाबत सुचना दिल्या.

त्यानंतर पो.नि. गुजर यांनी मला पंच क्र १ श्री.कानडे यांचेसह प्रत्यक्ष जावुन लोकसेवक सुपत यांची भेट घेण्यास सांगितले. त्यानंतर पो.नि.गुजर यांनी मला लोकसेवकास लाच देण्याकरीता रक्कम आणली आहे किंवा कसे? याबाबत विचारणा करता मी त्यांच्या समक्ष पाचशे रुपये दराच्या दहा नोटा (रुपये पाच हजार) हजर केले. सदर नोटांवरील क्रमांक पो.नि.गुजर यांनी एका कोऱ्या कागदावर लिहुन त्याची पंचाकरवी खात्री करुन घेवुन त्या कोऱ्या कागदावर पंचाच्या सह्या घेण्यात आल्या.

त्यानंतर लोकसेवक सुपत यांना भेटण्याकरीता मी जे.जे.रुग्णालय आवारात असलेल्या कॅन्टीनमध्ये भेटण्याचे ठरले. लोकसेवक सुपत यांनी फिर्यादी यांच्याकडुन स्विकारली तर फिर्यादी हे त्यांच्या डोळ्यावर असलेला चष्मा डोक्यावर घेतील, असा इशारा ठरविण्यात आला.

त्यानंतर पो.नि. गुजर यांच्या सुचनेवरुन पो.ना.चा.क्र.००-६३०/मर्चंडे यांनी मला व पंचाना त्यांचे ताब्यात असलेल्या शासकिय वाहनात बसुन अँन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले. त्यानंतर पंचासमक्ष मी दिलेल्या रुपये ५,०००/- किमतीच्या (रु.५००/- च्या १०) चलनी नोटांना पो.ना.चा.क्र.००-६३०/मर्चंडे यांनी अँन्थ्रासिन पावडर लावली व सदर रक्कम पो.ना.चा.क्र. ००-६३०/मर्चंडे यांनी मी परिधान केलेल्या शर्टच्या डाव्या खिश्यात ठेवली. सापळा कारवाईच्या पुढील कारवाईत पो.ना.चा. मर्चंडे हे भाग घेणार नसल्याचे सांगीतल्याने पो.ना.चा. मर्चंडे हे तेथून निघुन गेले. त्यानंतर पो.नि. गुजर यांनी त्यांच्या ताब्यातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या शर्टाच्या आतील बनियनला लावला.

त्यानंतर पो.नि.गुजर यांच्या सुचनेप्रमाणे लोकसेवक सुपत यांना भेटण्याकरीता जे.जे.रुग्णालय येथे १३.०५ वा. सुमारास निघालो. माझ्या पाठोपाठ सापळा पथकातील पोलीस अंमलदार सिरसाठ, पो.ना.कदम, पो.नि.गुजर, पो.नि.घाडीगांवकर पंच क्र १ श्री. कानडे व त्यांचे सोबत पोलीस पथक असे कोणासही संशय येणार नाही अशा स्थितीत जे.जे. कॅन्टीन येथे पोहोचलो.

त्यानंतर मी जे.जे. रुग्णालय येथील कॅन्टीनमध्ये पोहोचून लोकसेवक सुपत यांना त्यांचे मोबाईलवर फोन करुन मी कॅन्टीनमध्ये पोहोचलो असल्याचे सांगितले. त्यावर लोकसेवक हे काही वेळातच कॅन्टीनमध्ये पोहोचले. आम्ही कॅन्टीमध्ये असलेल्या एका टेबलवर समोरासमोर बसलो. मी लोकसेवक सुपत यांना माझे

समक्ष

( मनोज गुजर )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

कामाबाबत विचारणा केली असता, त्यांनी आज रिपोर्ट मिळणार नाही व तो मिळाला तरी माझ्या हातात मिळणार नसल्याचे सांगितले. तसेच ते ज्या वेळेस मला फोन करतील त्यावेळी नमुद रिपोर्ट संबंधीत पोलीसांना घेवून जाण्यास सांगितले. तसेच मला इकडे पुन्हा येण्याची गरज नसल्याचे सांगून लाचेच्या रक्कमेची मागणी केली. त्याप्रमाणे मी लाचेची रक्कम रु. ५,०००/- माझ्या शर्टच्या डाव्या खिशातुन बाहेर काढली असता ती किती आहेत असे विचारले.

त्यावेळेस मी त्यांना नमुद रक्कम माझ्या शर्टाच्या डाव्या शिखातून काढून उजव्या हाताने दिले व मोजण्यास सांगितले.त्यावर त्यांना माझ्यावर विश्वास आहे असे सांगून नमुद रक्कम स्विकारुन त्यांनी परिधान केलेल्या त्यांच्या निळ्या रंगाच्या हाफ पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवली असल्याचे मी पाहिले. त्यानंतर पोलीस अधिकारी व पोलीस पथक यांना दिसेल अशा रितीने मला ठरवून दिलेल्या इशाऱ्याप्रमाणे माझ्या डोळ्यावर असलेला चष्मा डाव्या हाताने मी माझ्या डोक्यावर लावला. नमुद इशारा पाहून पोलीस पथकातील पोलीस अंमलदार मिरगणे व पोलीस अंमलदार श्री. कदम हे लागलीच पुढे आले व त्यांनी लोकसेवक सुपत यांचा अनुक्रमे उजवा व डावा हात पकडून त्यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेतले.

त्याचवेळी पो.नि.गुजर यांनी पुढे येवून माझ्या बनियनला लावलेला व्हाईस रेकॉर्डर काढून तो बंद करुन आपले ताब्यात घेतला.त्यानंतर पो.नि.गुजर व पो.नि.घाडीगावकर यांनी लोकसेवक सुपत यांना आपली ओळख करुन दिली. पो.नि.गुजर यांनी नमुद लोकसेवक यांना त्यांचे नाव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव श्री. महेंद्र अशोक सुपत, वय ३३ वर्ष, धंदा-नोकरी, कक्ष सेवक, प्रयोगशाळा, जे.जे. रुग्णालय असे सांगितले. पो.नि. गुजर यांनी पंचासमक्ष लोकसेवक सुपत यांचेबाबत विचारणा केली असता, त्यांनी नमुद रक्कम ही त्यांचे हाफ पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवली असल्याचे सांगितले. पो.नि. गुजर यांच्या सुचनेप्रमाणे पंच क्र २ श्री. नचिकेत आमटे यांनी तपासणी केली असता, लोकसेवक यांनी परिधान केलेल्या निळया रंगाच्या हाफ पॅन्टच्या उजव्या खिशात ५,०००/- (भारतीय चलनाच्या रु. ५००/- दराच्या १० नोटा ) मिळून आली. सदरची रक्कम पो.नि. गुजर यांच्या सुचनेनुसार पंच क्र २ श्री. नचिकेत आमटे यांनी स्वत:च्या ताब्यात घेतली.

त्यानंतर नमुद व्यक्ति ही जे.जे. रुग्णालयाच्या आस्थापनेवर लोकसेवक म्हणून कार्यरत असल्याचे पो.नि.गुजर यांची खात्री झाल्याने त्यानी सापळा कारवाईची पुढील कार्यवाही ही नमुद कॅन्टीनमध्ये न करता ती. जे.जे.मार्ग पोलीस ठाणे येथे जावून करण्यात येणार असल्याचे सांगितले.

समक्ष

( मनोज गुजर )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

त्याप्रमाणे पो.नि.गुजर, पो.नि.धार्डीगावकर, पंच, पोलीस पथक असे लोकसेवक श्री. महेंद्र सुपत यांना घेवून जे.जे.मार्ग पोलीस ठाण्यात आलो. त्यानंतर पो.नि. गुजर यांच्या सुचनेनुसार माझ्या व लोकसेवक श्री.महेंद्र सुपत यांच्या कपड्याची व हाताची कृत्रीम काळोखात अल्ट्राव्हाईलेट दिव्याच्या प्रकाशात पंचासमक्ष तपासणी केली असता लोकसेवकाचे उजव्या हातास तसेच त्यांच्या नेसणीच्या हाफ पॅन्टच्या उजव्या खिशाजवळ व खिशात ठिकठिकाणी तसेच माझ्या उजव्या हाताचे तळहातावर व माझ्या शर्टाच्या डाव्या खिशावर अॅन्थ्रासीन पावडरची फिक्कट हिरवट रंगाची चकाकी दिसून आली.

लोकसेवक श्री. महेंद्र अशोक सुपत, धंदा-नोकरी, कक्ष सेवक, प्रयोगशाळा, जे.जे. रुग्णालय मुंबई यांच्याशी माझे कोणतेही पूर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देण्या-घेण्याचे व्यवहार नाहीत. लोकसेवक श्री. महेंद्र सुपत यांना देण्याकरीता आणलेली लाचेची रक्कम ही मी माझ्या वैयक्तिक बचतीतुन आणलेली आहे.

तरी लोकसेवक श्री. महेंद्र सुपत यांनी माझी पत्नी नामे ज्योती पंकज राजा हिचे जे.जे. रुग्णालयातील पॅथॉलॉजी विभागातून तिच्या मृत्युचे नक्की कारण समजण्याकरीता आवश्यक असलेले रासायनिक विश्लेषण अहवाल मिळवून देण्याकरीता काल दि. ३१.०१.२०१९ रोजी माझ्याकडे रु. ५,०००/- ची लाचेची मागणी करुन ती स्विकारण्याचे कबुल करुन आज दि.०१.०२.२०१९ रोजी जे. जे.रुग्णालच्या आवारातील कॅन्टीनमध्ये स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरोधात कायदेशीर फिर्याद असुन कारवाई होण्यास विनंती आहे.

माझा जबाब मराठीत संगणकावर टंकलेखीत करुन तो मी वाचुन पाहीला असता तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

( मनोज गुजर )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

9. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे — घडताक्षणी नोंद
Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मूल्य — 
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) —

11. अकस्मात मृत्यु / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक :
Unnatural / Accidental Death Case No., if any —

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे
First Information brief contents (Attach separate sheet, if required). Detail write down back blank page.

नमुद तारीख, वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांच्या मयत पत्नीचे जे जे रुग्णालयातील पॅथॉलॉजी विभागातून त्यांच्या मृत्युचे नक्की कारण समजण्याकरिता आवश्यक असलेला रासायनिक विश्लेषण अहवाल प्राप्त आलेले यांनी लवकर मिळवून देण्याकरिता रु. ५०००/- ची मागणी करून ते स्विकारण्याचे मान्य केले सदरची लाचेची रक्कम रु ५०००/- कायदेशीर परिश्रमाखेरीज फिर्यादीकडून आरोपी यांनी स्विकारल्यावर त्यास लाचेच्या रक्कमेसह पकडण्यात आले म्हणून कलम ७ भ्र प्र अधिनियम १९८८ (सुधारित) अन्वये गुन्हा नोंद

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, —

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन —, जिल्हा —, राज्य —

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) .............. Rank.............. No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .............................................. (3) Transferred to P.S ............................ District .......................... on point of jurisdiction.

तक्रारदार / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली, फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी याची सही
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ..... मनोज शुजर
हुद्दा Rank ..... पोलीस निरीक्षक
तांत्रिक अं. सा. का. क्र.
Posting
Code No. of I.O. ....................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख
1. Date and time of submitted to the Court.

प्रत 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. कार्यालय प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**